# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.08.2024** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- बदलापूर प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवला जाणार

- डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना सुचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून राष्ट्रीय कृती दलाची स्थापना.

- रत्नागिरी विमानतळाच्या नवीन प्रवासी टर्मिनल इमारतीचं आज भूमिपूजन.

आणि

- अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी शासनामार्फत 54 कोटी 55 लाख रुपयांची मदत मंजूर.

**बदलापूर**

ठाणे जिल्ह्यात बदलापुर इथल्या शाळेमध्ये चार वर्षांच्या दोन मुलींवरील अत्याचार प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देण्यात आले असून त्यासाठी विशेष चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे. या प्रकरणी आरोपी ला कडक शिक्षा केली जाईल, असं सांगत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवण्याचे आदेश दिले आहेत. संस्थाचालकांची चौकशी करून प्रसंगी त्यांच्यावरदेखील कारवाई केली जाईल असं शिंदे यांनी म्हटलं आहे. याप्रकरणी बदला पूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि हेड कॉन्स्टेबल यांच्या निलंबनाचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. महिला आय पी एस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा तपास करण्यात येणार असून कायद्यानुसार योग्य ती कारवाई केली जाईल असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी काल आंदोलनस्थळी भेट देऊन जमावाला शांत राहण्याचं आवाहन केलं. याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. राज्य महिला आयोगानं या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पोलिसांनी आत्तापर्यंत केलेल्या तपासाचा अहवाल मागवला आहे. दरम्यान या प्रकरणी सर्व अहवाल दोन दिवसात सादर करण्याचे आदेश ठाण्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई

यांनी दिले आहेत. तत्पूर्वी संबंधित शाळेतल्या या घटनेनंतर संतप्त पालकांनी काल बदला पूर रेल्वे स्थानकात तसंच शाळेच्या प्रवेशद्वाराजवळही आंदोलन केलं. या प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला अटक करण्यात आली असून त्याच्या विरोधात पोक्सो कायद्याच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलींच्या सुरक्षेसाठी राज्यातील सर्व शाळांमध्ये विशाखा समित्या स्थापन करणं बंधनकारक करण्याचे आदेश जारी करण्यात येणार असल्याचं शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी काल सांगितलं. बदलापूर घटनेनंतर मंत्रालयात शिक्षण विभागाची तातडीची बैठक घेण्यात आली. 13 ते 16 ऑगस्ट दरम्यान अत्याचाराची घटना घडली असून 18 ऑगस्ट रोजी याबाबतची तक्रार दिल्यानंतरही 12 तास कारवाई झाली नाही. शाळेलाही नोटीस बजावण्यात आली असून मुख्याध्यापिका, वर्गशिक्षका, सहाय्यक यांना निलंबित करण्यात आल्याचं केसरकर यांनी सांगितलं. सखी सावित्री समितीचं काम सुरू करण्याचे आदेश दिले होते. मात्र, शाळांमध्ये या समित्या स्थापन झाल्या नसतील तर संबंधित विभाग अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. मुलींच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी ई बॉक्स सोबतच तक्रार पेटी बंधनकारक करण्यात येईल असंही केसरकर यांनी सांगितलं. राज्यात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी समाज माध्यमातून केली आहे. तर सरकारने अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शक्ति कायद्याचं विधेयक मंजूर करावं असं आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलं आहे. दरम्यान बदला पूर प्रकरणी आंदोलन करणाऱ्या नागरिकांना पुण्यातील विविध शाळांच्या पालक संघटनांनी पाठिंबा जाहीर केला असून सर्वप्रथम या शाळेची मान्यता रद्द करण्याची मागणी केली आहे.

**कोलकाता प्रकरण**

देशातले डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना सुचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय कृती दलाची स्थापना केली आहे. या कृती दलाला तीन आठवड्यात हंगामी अहवाल आणि दोन महिन्यात अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली पीठानं काल दिले. कोलकाता इथल्या महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेविषयी चिंता व्यक्त केली. आरोग्य कर्मचाऱ्यांची कामाची जागा सुरक्षित असणं महत्त्वाचं असल्याचं न्यायालयानं म्हटलं. देशभरातल्या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेत कोणतीही कमतरता राहणार नाही, याबद्दल आश्वस्त करत न्यायालयाने आरोग्य कर्मचाऱ्यांना कामावर परतण्याचं आवाहन केलं आहे. दरम्यान, सर्व केंद्र सरकारी रुग्णालयांमध्ये सुरक्षा व्यवस्था 25 टक्के वाढवायला केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे. त्याबरोबरच कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी विविध उपाययोजना करण्याचे आदेश आरोग्य विभागानं या रुग्णालयांना आणि वैद्यकीय शिक्षण संस्थांना दिले आहेत.

**नवीन प्रवासी टर्मिनल**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या हस्ते आज रत्नागिरी विमानतळाच्या नवीन प्रवासी टर्मिनल इमारतीचं भूमिपूजन होणार आहे. तसंच, लोकनेते श्यामराव पेजे अभियांत्रिकी महाविद्यालय नामकरण आणि इमारत लोकार्पणही त्यांच्या हस्ते होणार असून, त्यानंतर महिलांच्या मेळा व्याला ते उपस्थित राहणार आहेत. पालकमंत्री उदय सामंत यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**ई-पंचनामा**

गेल्या फेब्रुवारी आणि एप्रिलमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाच्या तडाख्यात पिकांचे नुकसान झालेल्या अकोला जिल्ह्यातील 27 हजार 680 शेतकऱ्यांसाठी शासनामार्फत 54 कोटी 55 लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या याद्या ई पंचनामा पोर्टलवर भरण्याचं काम 14 ऑगस्टपासून महसूल प्रशासना मार्फत सुरू करण्यात आले आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणार आहे.

**जाहिरात रद्द**

केंद्रीय लोकसेवा आयोगाने जाहीर केलेली 45 पदांवरची समांतर भरतीची जाहिरात रद्द केली आहे. ही पद भरती रद्द करावी अशी विनंती केंद्रीय मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष प्रीती सुदन यांना केली होती. 2014 पूर्वी अनेक पदांवर अशाच प्रकारे भरती करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर पक्षपाती झाल्याचे आरोप झाले होते. पद भरतीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीनं आणि राज्यघटनेनं नमूद केलेल्या समानता आणि सामाजिक न्यायाच्या तत्वांशी सुसंगत असणं आवश्यक आहे. उपेक्षित समाजातल्या पात्र उमेदवारांना सरकारी सेवांमध्ये त्यांचं योग्य प्रतिनिधित्व मिळावं यासाठी आरक्षणाची तरतूद आहे. मात्र समांतर पद भरतीत आरक्षणाची तरतूद नाही. त्यामुळे लोकसेवा आयोगानं जाहिरात रद्द करावी अशी विनंती सिंह यांनी पत्राद्वारे केली होती.

**राज्यसभा**

भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीने विविध राज्यांमध्ये होणाऱ्या आगामी राज्यसभा पोट निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यात महाराष्ट्रातून धैर्य शील पाटील यांचं नाव जाहीर करण्यात आलं आहे.

**कृषी महोत्सव**

राज्य कृषी विभागातर्फे आजपासून बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ इथं राज्यस्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवाचं उद्घाटन केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, यांच्या हस्ते होणार आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्थेमध्ये बदल करण्यात आला आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराच्या वाऱ्यांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.**